# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## जाहिरात क्र. १०/२०१६

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील कार्यालयाकडील परीक्षा विभागाकडे सिस्टीम ॲनॅलीस्ट (System Analyst) हे पद रू. २५,०००/- दरमहा या **एकत्रित मानधनावर ५ वर्षाच्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरूपात** भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात **ऑनलाईन अर्ज** मागविण्यात येत आहेत. तसेच सदर पदांबाबतची अधिकची माहिती विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर “Recruitment” या सदरामध्ये उपलब्ध आहे.

| अ.क्र | पदाचे नाव | आरक्षण | शैक्षणिक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| 1 | System Analyst (सिस्टीम ॲनॅलीस्ट) | खुला | 1) M. Tech. (Computer Sc.) or I Class MCA, **OR** | 1) Five year experience in Computing at the level of System Analyst **OR** |
| | | | 1) I Class M.Sc. (Computer Sc. / Computer Software). **OR** | 1) Six years experience in computing at the level of System Analyst **OR** |
| | | | 1) Master’s Degree in Computer Science / Computer Software or B.E./B.Tech. in Computer Science or MCA | 1) Candidates of proven ability and 5 years experience in the industry / profession |

पात्र उमेदवारांनी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर “Recruitment” या सदरामध्ये उपलब्ध असणाऱ्या लिंकव्दारे Online पध्दतीने अर्ज **दि. २६/०७/२०१६** पर्यंत भरून, त्या ऑनलाईन अर्जाची प्रिंट काढून आवश्यक त्या साक्षांकित प्रमाणपत्रांसह या कार्यालयाकडे **दि.३०/०७/२०१६** पर्यंत **कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४** यांच्या नावे **सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत** पोस्टाने अथवा हस्तदेय सादर करावेत. या कार्यालयात पोष्टाने किंवा इतर माध्यमातून उशिरा प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**ठिकाण :-कोल्हापूर** — **डॉ.व्ही.एन.शिंदे**

**दिनांक :- ०६/०७/२०१६** — **प्रभारी कुलसचिव**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जाहिरात क्रमांक १०/२०१६

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर परीक्षा विभागाकडे सिस्टीम ॲनॅलीस्ट (System Analyst) हे पद रू. **२५,०००/- दरमहा या एकत्रित मानधनावर ५ वर्षाच्या कालावधीकरिता** भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमून्यात **ऑनलाईन** (Online) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | पदाचे नाव | आरक्षण | शैक्षणिक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | System Analyst (सिस्टीम ॲनॅलीस्ट) **रू. २५,०००/- दरमहा या एकत्रित मानधन** | खुला | 1) M. Tech. (Computer Sc.) or I Class MCA, OR | 1) Five year experience in Computing at the level of System Analyst OR |
| | | | 1) I Class M.Sc. (Computer Sc. / Computer Software). OR | 1) Six years experience in computing at the level of System Analyst OR |
| | | | 1) Master's Degree in Computer Science / Computer Software or B.E./B.Tech. in Computer Science or MCA | 1) Candidates of proven ability and 5 years experience in the industry / profession |

सदरच्या पदासाठी विद्यापीठाच्या विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर "Recruitment" या सदरात online करणे साठीची लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. Online पध्दतीने अर्ज **दि.२६/०७/२०१६ पर्यंत** भरून, त्या ऑनलाईन अर्जाची प्रिंट काढून आवश्यक त्या साक्षांकित प्रमाणपत्रांसह या कार्यालयाकडे **दि. ३०/०७/२०१६ पर्यत कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४** यांच्या नावे **सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत** पोस्टाने अथवा हस्तदेय सादर करावेत. फक्त ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्जच स्विकारले जातील.

- **सर्वसाधारण सूचना :-**

१. उमेदवारांसाठी किमान ३० वर्षे व कमाल ४० वर्षे ही वयोमर्यादा राहील. तसेच अपंग उमेदवारांसाठी शासन नियमानुसार वयोमर्यादा शिथलक्षम राहील.

२. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदाची किमान व कमाल वयोमर्यादा जाहिरात दिनांकास सापेक्ष समजण्यात येईल.

३. अर्जावर ज्या पदासाठी अर्ज करणार आहात त्या पदाचे नाव लिहणे आवश्यक.

४. उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्जच भरून पाठवावेत व उमेदवारांनी मा.वित्त व लेखाअधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या नावे कोल्हापूर येथे वटणारा रू. ५००/- इतक्या रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष किंवा विद्यापीठ कार्यालयात रोख रक्कम भरल्याची पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५. ऑनलाईन पध्दतीने न भरलेला, मुदतीत न येणाऱ्या व शुल्क नसलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अर्जासोबत सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे.

६. जाहिरातीतील पदे भरणे किंवा न भरणे यांचे हक्क विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

७. परीक्षा / मुलाखती यापैकी कोणत्याही टप्प्यावर टपालखात्याकडून उमेदवारास वेळेवर पत्र न मिळाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याबाबत कोणताही स्वतंत्रपणे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८. पात्रता अर्जाची स्वीकृती किंवा तो नाकारणे, चुकीची माहिती दिल्याबद्दल शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहीत. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

९. दि.२८/०३/२००५ नंतर २ पेक्षा जास्त मुले हयात नाहीत, याबाबत उमेदवाराने शासनाच्या दि.२८/०३/२००५ च्या अधिसुचनेनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मध्ये नमूद केल्यानुसार नमुना **“अ”** मध्ये प्रतिज्ञापत्र भरून देणे आवश्यक राहील.

१०. प्राप्त अर्जांची संख्या विचारात घेवून लेखी परीक्षा घेण्यात येईल. प्रत्यक्ष पदे भरतेवेळी उपलब्ध पदानुसार पदसंख्याकमी किंवा जास्त होऊ शकेल.

११. महिला उमेदवारांनी आपल्या नावातील बदलाबाबतचे योग्यते प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१२. एखाद्या उमेदवाराने निवडीसाठी कोणत्याही पध्दतीने प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून कोणत्याही पातळीवर बाद करण्यात येईल.

१३. जाहिरातीतील पदांची आवश्यकता वाटल्यास लेखी परीक्षा (चाळणी परीक्षा) घेतल्या जातील. तसेच प्रात्यक्षिक परीक्षा व मुलाखतीही घेतल्या जातील. याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी. लेखी परीक्षेसाठी कागदपत्रे व इतर पात्रतेच्या अटीस अधीन राहून परीक्षेस बसणेस परवानगी देण्यात येईल. तथापि जे उमेदवार १ : ५ प्रमाणात गुणानुक्रमे पुढील प्रक्रियेसाठी पात्र होतील त्यांची कागदपत्रे व इतर अनुषंगिक पात्रता तपासण्यात येईल. यामध्ये अपात्र झालेल्या उमेदवारांना पुढील भरती प्रक्रियेत अपात्र समजण्यात येईल. यासंदर्भात कोणताही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.

१४. भरती प्रक्रियेसंदर्भातील बदल / शुध्दीपत्रके / परिक्षेचा अभ्यासक्रम इ. बाबी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर **“Recruitment”** या सदरामध्ये प्रसिध्द करण्यात येईल.

१५. ज्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव होईल, अशा उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांनूसार त्यांच्या कागदपत्रांची छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास, वेळेवर व ठरवून दिलेल्या ठिकाणी मूळकागदपत्रे व त्याच्या छायांकित प्रती साक्षांकित करून स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक आहे. सदर दिवशी उमेदवार अनुपस्थित राहील्यास, त्याचे नाव गुणवत्ता यादीतून काढून टाकले जाईल. याबाबत कोणतीही विनंती / तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तद्नंतर प्रतिक्षा यादीमधील उमेदवारास पुढील प्रक्रियेसाठी बोलाविण्यात येईल.

१६. गुणवत्ता यादीतील उमेदवारांचे प्रात्यक्षिक / मौखिक परीक्षेवेळी मुळ कागदपत्रांची छाननी मुलाखतीपूर्वी करण्यात येईल. उमेदवारांची कागदपत्रे वैध नसल्यास, मुलाखत घेतली जाणार नाही.

१७. लेखी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा व मौखिक परीक्षेसाठी उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित राहायचे आहे. त्यांना विद्यापीठामार्फत कोणत्याही प्रकरचा प्रवास व दैनंदिन भत्ता दिला जाणार नाही.

१८. उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने भरेलेला अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह या कार्यालयाकडे **दि.३०/०७/२०१६ पर्यंत मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४.** यांच्या नावे **सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत** पोहोच होतील अशा रितीने पाठवावेत. वेळेनंतर कार्यालयात पोष्टाने किंवा इतर माध्यमातून प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**ठिकाण :- कोल्हापूर**
**दिनांक :- ०६/०७/२०१६**

**डॉ.व्ही.एन.शिंदे**
**प्रभारी कुलसचिव**